# अंतिम वर्षाचीच परीक्षा?

## यूजीसी आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे संकेत

म. टा. प्रतिनिधी, पुणे

करोनाच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासोबत राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांच्या यंदा केवळ अंतिम वर्षांच्या परीक्षा होण्याची दाट शक्यता असून, इतर वर्षांच्या परीक्षा होणार नसल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण विभागातील सूत्रांनी दिली आहे. इतर वर्षांचा निकाल हा प्रथम सत्रातील गुण आणि शैक्षणिक मूल्यांकनाच्या आधारावर जाहीर होण्याची शक्यता आहे. मात्र, याबाबत उच्च व तंत्र शिक्षण शिक्षण विभागाकडून कुणीही अधिकृतपणे बोलण्यास तयार नाही. दरम्यान, केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री रमेश पोखरियाल निशंक यांनीदेखील अशा प्रकारची माहिती त्यांच्या फेसबुक लाइव्हमध्ये दिली आहे.

यूजीसीने परीक्षा आणि वेळापत्रकाबाबत स्थापन केलेल्या समितीने परीक्षांच्या उपाययोजनांबाबत विद्यापीठांना सूचना केल्या आहेत. त्यामध्ये 'कॅरी फॉरवर्ड'सारखे पर्याय देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे निशंक यांनी आपल्या 'फेसबुक लाइव्ह'मध्ये यूजीसीच्या नियमांचा दाखला देऊन, रेड झोनमध्ये असणाऱ्या ठिकाणी परीक्षा घेणे अवघड काम आहे. त्यामुळे अशा वेळी केवळ अंतिम वर्षाची परीक्षा घेऊन, इतर वर्षांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रथम सत्रातील गुण आणि त्या विद्यार्थ्यांचे द्वितीय सत्रातील मूल्यांकनाच्या आधारे, पुढील वर्षांसाठी वर्गोन्नती देण्यात येण्याची शक्यता असल्याचे सांगितले. दरम्यान, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षा घेण्याबाबत मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, एसएनडीटी विद्यापीठाचे कुलगुरू शशिकला वंजारी, कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू देवानंद शिंदे, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. अभय वाघ, उच्च तंत्रशिक्षण विभागाचे संचालक धनराज माने यांची समिती स्थापन केली होती. या समितीच्या अहवालावर नुकतीच चर्चा करण्यात आली असून, तो आता मान्यतेसाठी राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. या मान्यतेनंतर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत परीक्षांबाबत निर्णय जाहीर करतील.



### विद्यापीठाच्या परीक्षा अर्जाला स्थगिती

राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या परीक्षांसंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) प्राप्त झालेली मार्गदर्शक तत्त्वे; तसेच राज्य सरकारकडून याबाबत होणार निर्णय लक्षात घेऊन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सर्व परीक्षांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया स्थगित केली आहे. पुढील आदेश प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना याबाबत माहिती कळविण्यात येईल. पुणे विद्यापीठाशी पुणे, नाशिक, नगर जिल्ह्यातील संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांनी याबाबत आपल्या विद्यार्थ्यांना अवगत करावे, अशा सूचना परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली आहे.

### विद्यापीठाचीही केवळ अंतिम वर्षाची परीक्षा ?

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात पुणे, नगर आणि नाशिक जिल्हे येतात. करोनाच्या पार्श्वभूमीवर हे तिन्ही जिल्हे रेड झोनमध्ये येतात. त्यातच या तिन्ही जिल्ह्यात रूग्णांची संख्या वाढत आहे. त्यामुळे अशा वेळी महाविद्यालयांमध्ये परीक्षेचे आयोजन करण्यात अडचणी येऊ शकतात. तर, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने खूप काळजी घ्यावी लागणार आहे. अशा वेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांच्या केवळ अंतिम वर्षाच्या परीक्षा होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

पुढारी

# विद्यापीठ परीक्षांचे वेळापत्रक आज

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

महाविद्यालयामध्ये प्रथम, द्वितीय वर्षाला शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना ५०:५० फॉर्मुल्याचा वापर करून गुणांकन केले जाणार आहे. तर शेवटच्या वर्षाची परीक्षा नेहमीप्रमाणे घेतल्या जाण्याची शक्यता आहे. राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षेसंदर्भात नियुक्त केलेल्या समितीने अहवाल सादर केल्यानंतर आता राज्यातील विद्यार्थ्यांना परीक्षांचे वेळापत्रक शुक्रवारी (आज) दुपारी मिळण्याची शक्यता आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील विद्यापीठ, महाविद्यालय आणि सीईटी परीक्षेचे वेळापत्रकासंदर्भात गेल्या दोन दिवसापूर्वी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी समिती सदस्यांची चर्चा केली होती. त्यावेळी कोणत्याही

## प्रथम, द्वितीय वर्षाला ५०:५० फॉर्म्युला?

विद्यार्थ्यांचे नुकसान न करता वेळापत्रक दोन दिवसात जाहीर करण्यात येईल असे सांगितले होते. त्यानंतर गुरुवारी परीक्षा संदर्भातील नेमलेल्या कुलगुरूंच्या समितीचा अहवाल सरकारला सादर झाला असून यासंदर्भात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा झाली असून शुक्रवारी (८ मे) रोजी यासंदर्भातील निर्णय जाहीर केला जाईल, अशी माहिती उदय सामंत यांनी ट्विटच्या माध्यमातून दिली आहे.

राज्यातील विद्यापीठांची असलेली पायाभूत स्थिती, विद्यापीठांत असणारी लाखोंची विद्यार्थी संख्या, भौगोलिक परिस्थिती आणि वेगवेगळे तंत्रज्ञान वापरून असलेली विद्यापीठातील परीक्षा पद्धत यामुळे राज्यातील विद्यापीठांचे परीक्षांचे वेळापत्रक बनविण्यासाठी समितीच्या वतीने दोन दिवस बैठकांचे सत्र सुरू होते. विद्यापीठांतील माहिती संकलित करुन त्याचबरोबर विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या शिफारसीनुसार अहवाल तयार करून सरकारला पाठवल्यानंतर शुक्रवारी यासंदर्भातील निर्णय सरकार जाहीर करणार आहे.

समितीने सादर केलेल्या या अहवालात कुलगुरूंनी प्रथम, द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना ५० टक्के गुण त्यांच्या आत्तापर्यंतच्या शैक्षणक कामगिरीनुसार तर ५० टक्के गुण हे अंतर्गत मूल्यमापनाच्या आधारे देण्यात यावेत ,अशी सूचना केल्याचे सूत्रांकडून समजते.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात लवकरच टेस्टिंग लॅब

## फेरप्रस्ताव सादर करण्याचा प्रशासनाचा आदेश : साथीच्या आजारांचे होणार निदान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

**शिवाजी विद्यापीठात लवकरच साथीच्या आजारांचे निदान करणारी कायमस्वरूपी टेस्टिंग लॅब सुरू होणार आहे. या प्रयोगशाळेसाठी फेरप्रस्ताव सादर करा, असे आदेश गुरुवारी जिल्हा प्रशासनाने विद्यापीठ प्रशासनाला दिले. या प्रयोगशाळेला जिल्हा नियोजन समितीतून निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे.**

### ...अशी असेल प्रक्रिया

टेस्टिंग लॅब उभारणीसाठी 'आयसीएमआर'ची मानके पूर्ण करण्यासाठी विविध घटकांची आवश्यकता असते. यात टेस्टिंग लॅब 'एनएबीएल'ची ॲक्रिडेटेड असणे महत्त्वाचे आहे. यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज आहे. 'बीएसएल ३' संसर्ग हाताळण्याची सुविधा असली पाहिजे. 'डीएचआर' व 'एनआयव्ही'च्या मंजुरीने 'आयसीएमआर'कडे प्रस्ताव पाठवला जाणार आहे. जिल्हा प्रशासनाच्या परवानगीने हा प्रस्ताव आरोग्य विभाग, राज्य सरकारच्या परवानगीनंतर केंद्र सरकारकडे पाठविण्यात येणार आहे.




कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाने कायमस्वरूपी टेस्टिंग लॅब उभारण्याचा निर्णय घेतला आहे. भविष्यात कोणत्याही साथीच्या आजाराचे निदान करण्यासाठी चाचण्या करता येतील, अशा दृष्टीने या प्रयोगशाळेची उभारणी केली जाणार आहे. त्याबाबतचा प्रस्ताव कुलगुरू डॉ.



देवानंद शिंदे यांनी जिल्हा प्रशासनाला सादर केला होता.

या प्रस्तावावर गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री सतेज पाटील यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीत प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीत या प्रयोगशाळेसाठी १ कोटी ४० लाखांचा खर्च अपेक्षित असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने सांगितले. त्यावर याबाबत सविस्तर नियोजन करावे, खर्च कमी करता येईल का, यादृष्टीने काही बदल करता येतील का ते पाहा आणि फेरप्रस्ताव सादर करा, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या.

या प्रयोगशाळेसाठी जिल्हा नियोजन समितीमधून निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे पालकमंत्री पाटील यांनी स्पष्ट केले. राज्य शासनाने जिल्हा नियोजन समितीच्या निधीला कात्री लावली असली, तरी जो निधी उपलब्ध होणार आहे, त्यापैकी २५ टक्के निधी कोरोना उपाययोजनांसाठी खर्च करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. यामुळे जिल्ह्यासाठी २० ते २५ कोटींचा निधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. या निधीतून प्रयोगशाळेची उभारणी केली जाणार आहे.

ही प्रयोगशाळा उभी राहिली, तर जिल्ह्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे. या प्रयोगशाळेद्वारे केवळ कोरोनाच नव्हे, तर स्वाईन फ्लू, डेंग्यू, इबोला आदी विविध प्रकारच्या विशेषत: साथीच्या आजारांच्या चाचण्या कायम करता येणार आहेत. या प्रयोगशाळेची विद्यापीठात कोठे उभारणी करायची, याबाबत समिती स्थापन केली आहे. या समितीची उद्या, शुक्रवारी बैठकही होणार आहे. या सर्व पार्श्वभूमीवर येत्या दोन-तीन महिन्यांत विद्यापीठात ही कायमस्वरूपी प्रयोगशाळा कार्यान्वित होण्याची शक्यता आहे.

# विद्यापीठात 'मानवी मूल्ये' विषयावर कोर्स

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागामार्फत 'मानवी मूल्ये' या विषयावर मोफत कोर्सचे आयोजन केले आहे. सोमवार, ११ मेपासून ऑनलाईन पद्धतीने तीस दिवस हा कोर्स शिकविला जाणार आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील यांनी दिली. हा कोर्स १० जून पर्यंत दररोज सकाळी ९.३० ते १०.३० या वेळेत होणार असून या कोर्समध्ये स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे सहाय्यक प्रा. डॉ. पी. जे. पाटील व तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. नाव नोंदणीची मुदत १० मे रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत असून, संकेतस्थळावर कॉलेज व विद्यापीठात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी १० मेपूर्वी नावनोंदणी करायची आहे. संकेतस्थळावर जाऊन व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमध्येही सामील व्हावे, असे आवाहन डॉ. पाटील यांनी केले आहे.

तरुण भारत Fri, 08 May 2020
https://epaper.taru